निवडक



**नागेशी : येथील श्री नागेश महारुद्र मंदीरात गुरुवारी साजरा केलेला गुलालोत्सव. यावेळी पहाटे पालखीनंतर देवाला गुलाल वाहिल्यावर उपस्थित समिती सदस्य, महाजन, अर्चक, कुळावी व ग्रामस्थांनी एकमेकांस गुलाल लावून रंगपंचमी साजरी केली.**

## मिशन फॉर लोकल पेडणेतर्फे बांदोडकर जयंती साजरी

*■ टीम दैनिक हेराल्ड*

गोव्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांनी राज्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासाचा भक्कम पाया रचला आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच बहुजन समाजाकडे राजकीय नेतृत्व आले, परंतु दुर्दैवाने या नेतृत्वाला त्यांच्या दूरदृष्टी विचारांचा विसर पडला आहे. या बहुजन नेत्यांकडूनच अप्रत्यक्ष भाऊसाहेबांच्या धोरणांची थट्टा सुरू आहे, अशी टीका पत्रकार किशोर नाईक गावकर यांनी केली.

मिशन फॉर लोकल पेडणेतर्फे गोव्याचे भाग्यविधाते स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना नाईक गांवकर यांनी हा आरोप केला. संस्थेचे संस्थापक राजन कोरगावकर यावेळी उपस्थित होते. भाऊसाहेब बांदोडकरांकडे राज्याचे नेतृत्व आले नसते तर कदाचित गोव्याचे चित्र वेगळेच झाले असते. ह्याच बहुजन समाजाला संरक्षण देण्यासाठी तसेच त्यांच्या सामाजिक विकासासाठी भाऊसाहेब बांदोडकर गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण करण्याच्या विचारात होते. ह्याच विषयावरून त्यांना खलनायक बनवण्याचा खटाटोप करणारेच आज गोव्याच्या जमिनी परप्रांतीयांच्या घशात घालून इथल्या बहुजन समाजाला देशोधडीला लावण्यासाठी वावरत आहेत, अशी टीकाही नाईक गांवकर यांनी केली. जमीन सुधारणा कायदे मगोच्या राजवटीत आले परंतु आज गोवा मुक्तीला ६३ वर्षे उलटूनही बहुजन समाजाला जमीन मालकीचे अधिकार मिळत नाहीत. लोकांसाठी वावरण्याचे सोडून आजचे बहुजन नेते स्वःविकासात मग्न आहेत. सामान्य लोकांच्या जमिनीचे प्रश्न सोडविण्याचे सोडून हेच नेते आता नवे भाटकार म्हणून उदयास आले आहेत, असा टोलाही नाईक गावकर यांनी मारला. भाऊसाहेब बांदोडकर आणि पेडणेचे अनोखे नाते आहे. पेडणे मतदारसंघात या भूमीचा पुत्र आमदार होणे हीच खरी भाऊसाहेबांना आदरांजली ठरावी. निवडणूक काळात पैशांचे आमिष दाखवून पेडणेकरांना गुलाम बनवणाऱ्या या नेत्यांनी पेडणेच्या नावाने केवळ आपली तुंबडी भरली आहे. पेडणेकरांनी आता जागे होण्याची वेळ आली आहे, असे राजन कोरगावकर म्हणाले.

---

## ‘गॅस सुरक्षा’वर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २२** : गोवा चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीजच्या ‘ग्राहक सुरक्षा समिती’तर्फे मुरगाव एज्युकेशन सोसायटी (एम.ई.एस) कॉलेजमध्ये ‘गॅस सुरक्षा’ या विषयावर एकमार्गदर्शनपर कार्यक्रम अलिकडेच आयोजित केला गेला. वरील कॉलेजच्या कंज्यूमर वेल्फेअर सेल आणि नागरी पुरवठा ग्राहक व्यवहार खाते यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित झाला. प्रारंभी वरील कॉलेजच्या प्राचार्य डॉ. मनस्वी कामत यांनी स्वागतपर भाषण केले. जीसीसीआय च्या ग्राहख सुरक्षा समितीच्या अध्यक्ष अमिता नायक सलत्री यांनी समितीतर्फे गेल्या वर्षभर आयोजित केलेल्या सात ‘ग्राहक जागृती’ पर कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच ग्राहकांचे सगळे सहा हक्क सविस्तरपणे सांगितले. कुठ्ठाळी येथील बांदेकर गॅस एजन्सीचे विराज बांदेकर यांनी ‘गॅस सुरक्षा’ या विषयावर अगदी परिपूर्ण असे मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना केले. ‘ग्रस, शेगडी, रेग्युलेटर, रबर पाईप’ या सगळ्या वस्तूंवर आय.एस.आय हा मार्क असणे सक्तीचे आहे. जेव्हा आपण घर बंद करून प्रवासाला जातो. तेव्हा रेग्युलेटर पूर्णपणे काढून घेऊन त्याठिकाणी झाकण लावून ठेवणे ही खूर सुरक्षिततेची बाब आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच गॅस चालू असताना तिथे कसल्याही किटक नाशकाचा फवारा केल्यास गॅसस्फोठ होऊन आपला जीव जाऊ शकतो, असे त्यांनी पुढे सांगितले. उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांी रेग्युलेटर कसा लावावा यावरही मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध शकांचे त्यांनी निरसन केले.

ग्राहक सुरक्षा समितीचे उपाध्यक्ष के. एस. नायर यांनी बांदेकर यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. रोहित कामत ायंनी सूत्रसंचान केले. प्रा. संजना हळर्णकर यांनी आभार प्रदर्शन केले. ग्राहक सुरक्षा समितीचे सदस्य हिंदूस्थान पेट्रोलियम लिमिटेडचे गोवा विभागाचे प्रमुख वैभव भगत हा कार्यक्रम आयोजित करण्यास मदत केली. एक महत्त्वपूर्ण विषयावरचा कार्यक्रम आपल्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्याबद्दल प्राचार्य डॉ. मनस्वी कामत यांनी अमिता सलत्री आणि त्यांचे समितीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# हैदराबादचा ‘शानदार’ विजय

## इशान किशनचे शानदार शतक | संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांची दमदार फलंदाजी

**हैदराबाद, दि. २३ :**



शान किशनच्या दिखाखदार शतकाच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादने पहिल्याच सामन्यात दणदणीत विजय साकारला. इशानच्या शतकाच्या जोरावर हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २८६ धावांचा डोंगर रचला. यावेळी आयपीएलचा सर्वाधिक धावांचा विक्रम त्यांचा फक्त दोन धावांनी हुकला. हैदराबादच्या २८७ धावांचा पाठलाग करताना राजस्थानच्या संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी दमदार फलंदाजी केली खरी, पण अर्धशतक झळकावून हे दोघेही बाद झाले आणि हैदराबादने राजस्थानला धुळ चारत ४४ धावांनी हा सामना सहज जिंकला आणि विजयी बोहनी केली.

इशान किशन आणि ट्रेव्हिस हेड या दोघांनी राजस्थानच्या गोलंदाजांना आपल्यापुढे लोटांगण घालायला भाग पाडले. कारण पहिल्या सात षटकांतच त्यांनी संघाचे शतक पूर्ण केले होते. त्यामुळे या सामन्यात हैदराबादचा संघ ३०० धावांचा पल्ला गाठून इतिहास रचणार, असे वाटत होते. ट्रेव्हिस हेडने यावेळी ३१ चेंडूंत ९ चौकार आणि तीन षटाकारांच्या जोरावर ६७ धावांची खेळी साकारली. हेड बाद झाला असला तरी इशान किशनने आपली फटकेबाजी सुरुच ठेवली, इशान किशनने आपले अर्धशतक झळकावले आणि त्यानंतर त्याने शतकाच्या दिशेने कूच करायला सुरुवात केली. इशान यावेळी अशी दमदार फटकेबाजी करत होता की, त्याची तोड राजस्थानच्या गोलंदाजांकडे नव्हती. इशान किशन यावेळी राजस्थानच्या गोलंदाजीवर जोरदार प्रहार करत होता आणि ही गोष्ट करत असतानाच इशानने आपले पहिले आयपीएलचे शतक झळकावले. इशानने यावेळी ४७ चेंडूंत ११ चौकार आणि सहा षटकाराच्या जोरावर नाबाद १०६ धावांची खेळी साकारली. त्यामुळेच हैदाराबादच्या संघाला २८६ धावा करता आल्या.

**खझड मधील ’हे’ १० रेकॉर्ड तुम्हांला माहित आहेत का?**

हैदराबादच्या २८७ धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी राजस्थानचे आव्हान जीवंत ठेवण्याचा चांगलाच प्रयत्न केला होता. संजू सॅसनने यावेळी ६६ धावांची तुफानी खेळी साकारली, तर जुरेलने यावेळी ७० धावांची धडाकेबाज खेळी केली. पण या दोघांची भागीदारी संपुष्टात आली आणि तिथेच राजस्थानने हा सामना गमवला.

सनरायझर्स हैदराबाद: पॅट कमिन्स (कर्णधार), ट्रेव्हिस हेड, अभिषेक शर्मा, ईशान किशन, नितीश रेड्डी, हेनरिक क्लासेन (यष्टीरक्षक), अभिनव मनोहर, अनिकेत वर्मा, कामिंदू मेंडिस/अॅडम झांपा, हर्षल पटेल, मोहम्मद शमी आणि राहुल चहर.

राजस्थान रॉयल्स: रियान पराग (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, संजू सॅमसन, नितीश राणा, शिमरोन हेटमायर, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), वानिन्दु हसरंगा, जोफ्रा आर्चर, आकाश माधवाल, संदीप शर्मा, महेश तीक्षणा आणि फजलहक फारुकी.

## केरी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा, विज्ञान दिवस



**केरी : न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा व विज्ञानदिन कार्यक्रमात बोलताना शिक्षक वरद परब. सोबत अमृत पेडणेकर, मुख्यद्यापक भावार्थ मांद्रेकर व इतर.**

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २३** : मराठी फक्त भाषा नसून ती संस्कृती आहे. मराठी भाषा ही आपली माता आहे. मराठी भाषेला अधिकाधिक संपन्न करण्यासाठी व तिच्या समृद्धीसाठी ज्या साहित्यिक महात्म्यांनी आपले जीवन व्यतीत केले, त्यांच्याबद्दल आपण ऋणी असले पाहिजे. विद्यार्थ्यांना कोणताही विषय त्यांच्या मातृभाषेतून शिकवला तर अधिक चांगल्या पद्धतीने समजतो, असे गोवा फिटनेस विजेता तथा पीटर अल्वारीस मेमोरियल हायस्कूलचे गणित विषयाचे शिक्षक वरद पद्माकर परब यांनी केले.

केरी न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा दिवस व विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने प्रमुख पाहुणे परब बोलत होते. अभ्यासाबरोबर मुलांनी आपल्या आरोग्याची सुद्धा काळजी घेतली पाहिजे. अभ्यासात प्रगती सुदृढ आरोग्यमुळे होऊ शकते. याकडे लक्ष द्यावे, असे मत शिक्षक परब यांनी व्यक्त केले.

कुसुमाग्रज यांची जयंती तसेच मराठी राज्यभाषा दिवस व विज्ञान दिवस याचे औचित्य साधून न्यू इंग्लिश विद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्कूल पी. टी. ए. अध्यक्ष अमृत पेडणेकर, प्रायमरी पी. टी. ए. अध्यक्ष प्रज्योती वस्त, शाळेचे मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर, ज्येष्ठ शिक्षक सर्वेश कोरगावकर, प्रायमरी वरिष्ठ शिक्षिका सलोनी हर्जी व स्कूल पी. टी. ए. सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषेतील विविध महान ग्रंथ व कवी यांच्याबद्दल माहिती सांगितली.विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात मराठी भाषेचा वापर करण्याचे आवाहन मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने व कवी कुसुमाग्रज व विज्ञान तज्ज्ञ सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाले. शाळेची शिक्षिका शर्मिला नाईक यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. शिक्षिका वैशाली न्हाजी यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय व स्वागत केले.

यावेळी मराठी भाषा दिनानिमित्त प्राथमिक स्तरावर बडबडगीत, कथाकथन स्पर्धा तर माध्यमिक स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, कविता गायन व नाट्यछटा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. इयत्ता नववीच्या मुलांनी विज्ञान दिनानिमित्त छोटीशी नाट्यछटा व पलळशपीं खपवळरप डलळशपींळीीी वर पी. पी.टी तसेच कुसुमाग्रज यांच्या जीवन कार्यावर पी. पी. टी सादर केली. इयत्ता आठवीच्या मुलींनी विज्ञान गीत सादर केले. नववीची विद्यार्थ्यांनी कुमारी वैष्णवी वि. राणे हिने सूत्रसंचालन तर शिक्षक गुरुप्रसाद तांडेल यांनी आभार मानले.

## मांद्रे सार्वजनिक गुढीपूजन, नववर्ष स्वागतासाठी जोरदार तयारी

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २३ :** गुढीपाडव्याच्यानिमित्त हिंदू नववर्षाचे स्वागत सार्वजनिक गुढीपूजन व मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून, त्याच्या जोरदार तयारीसाठी गावात ठिकठिकाणी बैठका सुरू असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष मुकूद कायसुकर व महेश गोडकर यांनी दिली.

मांद्रे आस्कावाडा येथील श्री. पूर्खे रवळनाथ देवस्थानात तरुण मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते. तरुणांचा उत्साह आणि सहभाग समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतो. गुढीपाडवा हा सण आनंद, नवचैतन्य आणि नव्या सुरुवातीचं प्रतीक असल्यामुळे अशा एकत्र येण्यामुळे सामाजिक एकता आणि संस्कृतीची जपणूक होत असते, असे विचार संपर्कप्रमुख विनायक च्यारी यांनी बैठकीत मांडले.

मांद्रे आस्कावाड्यावरील युवक व श्री दत्त पद्मनाभ पिठ संचालित संत समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०१९ पासून मांद्रे गावात सार्वजनिक गुढीपूजन व नववर्ष स्वागत तसेच मिरवणुकीचे आयोजन सुरू केले. यामध्ये माद्रे आस्कावाड्यावरील युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पहिली सार्वजनिक गुढी श्री पुर्खे रवळनाथ मंदिराच्या प्रांगणात उभारून मिरवणूक यशस्वीपणे काढली होती, असे च्यारी यांनी सांगितले.



**मांद्रे : नववर्ष स्वागत समितीची बैठकीत मुकुंद कायसूकर, सुभाष पार्सेकर, विनायक च्यारी, महेश गोडकर, पुर्खे व इतर.**

यंदाच्या वर्षी रविवार दि. ३० रोजी सार्वजनिकरित्या गुढीपूजन कार्यक्रम सकाळी ६ वाजता, मांद्रे श्रीदेवी भगवती सप्तेश्वर प्रांगणात होईल. समाज एकत्रीकरण व पारंपरिक संस्कृतीचा गौरव राखणाऱ्या या उपक्रमासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन, मांद्रे नववर्ष स्वागत समिती अध्यक्ष मुकुंद कायसूकर यांनी केले आहे.या बैठकीस उपाध्यक्ष सुभाष पार्सेकर, मंगेश नाईक, गौरेश कोरगावकर, बाबू पुर्खे, तिर्थराज म्हामल, स्वप्निल बागकर, दिनेश मयेकर, समीर साळगावकर, रवींद्र म्हामल, अनिश शेटकर, तुषार पुर्खे, सुहेल म्हामल, लाडू पुर्खे, मनोज म्हामल, अर्जुन गोडकर, रजत म्हामल, प्रेमानंद म्हामल, संकेत पुर्खे, कृष्णा गोडकर, कल्पेश दाभोलकर आदी उपस्थित होते. या बैठकीचे स्वागत व सूत्रसंचालन, संयोजक महेश गोडकर यांनी केले. तरी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन संस्कृती जतन व संवर्धनकामी कार्यात योगदान देण्याचे आवाहन समिती अध्यक्ष मुकुंद कायसूकरने केले आहे.

## भूमिका डे बोर्डिंग स्कूल खांडोळाचे स्नेहसंमेलन, बक्षीस समारंभ

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २३** : दीपक मेमोरियल एज्युकेशन सोसायटी संचालित भूमिका डे बोर्डिंग स्कूल खांडोळा माशेलचे स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ शांतादुर्गा देवस्थान वरगाव तिवरे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सेवानिवृत्त शिक्षिका सरिता देसाई खांडेकर, सन्माननीय अतिथी डॉ. श्रीवदन केशव आरोस्कर,पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सिद्धेश नाईक, पालक शिक्षक संघाच्या सदस्या शमिता तारी, पालक शिक्षक संघाचे सदस्य यशवंत देसाई, शाळा कार्यकारी समितीचे सदस्य नवनाथ सतरकर आणि मुख्याध्यापिका सुनीता पावसकर उपस्थित होत्या.



**खांडोळा : स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी बक्षीस वितरण करताना मान्यवर, सरिता देसाई खांडेकर. सोबत यशवंत देसाई, डॉ. श्रीवदन केशव आरोस्कर, सिद्धेश नाईक, शमिता तारी, नवनाथ सतरकर व सुनीता पावसकर.**

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, त्यानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले.योगा विभागातील विद्यार्थ्यांनी अतिशय मनमोहक अशा कलात्मक योग नृत्याद्वारे अतिथींचे स्वागत केले.

स्नेहसंमेलनाचा विषय गोव्याच्या लोकनृत्यांचा होता, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कुणबी नृत्य, कळशी नृत्य, कोळी नृत्य, कट्टी नृत्य इत्यादी विविध लोकनृत्यांवर मनमोहक सादरीकरण करुन प्रेक्षकांची मने जिंकली. विविध स्पर्धा, शैक्षणिक आणि खेळातील पारितोषकांचे यावेळी वितरण करण्यात आले.

यावेळी सरिता देसाई खांडेकर यांनी मातृभाषेच्या महत्त्वासोबतच इतर भाषांच्या गरजेवर मार्गदर्शन केले. मातृभाषा ही आपल्या विचारसरणीला आणि शिकण्याच्या प्रक्रियेला मजबूती देते,तसेच इतर भाषांचे ज्ञान देखील तितकेच महत्त्वाचे आहे,कारण त्यातून अधिक संधी उपलब्ध होतात.

डॉ. श्रीवदन केशव आरोसकर यांनी विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी कशा ओळखायच्या, योग्य करिअर निवड कशी करावी आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयारी कशी करावी याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने सर्व महिला पालकांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. हा उपक्रम महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या अथक परिश्रमांची दखल घेण्यासाठी आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका दिपिक्षा दीपक मांद्रेकर यांनी केले तर शिक्षक संग्रामसिंह चौगुले यांनी आभार प्रदर्शन केले. शिक्षिका स्नेहा पावसकर तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.





**मडगाव : २३७व्या काव्य मैफलीत उपस्थित कवि कवयित्री. सोबत काव्य मैफलच्या संस्थापिका कविता बोरकर व मान्यवर.**

## उत्तमोत्तम कवितांनी काव्यमैफल रंगली

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २३** : अशोक बोरकर काव्यमैफल चा २३७वा कार्यक्रम खास ठरला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून यावेळी आपल्या व्यावसायिक क्षेत्रात जिद्दीने पाय रोवणाऱ्या महिला उद्योजक शोभा धामस्कर आणि गायत्री हळबे यांचा साहित्यिका मेघना कुरूंदवाडकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच काव्य मैफलच्या ज्येष्ठ सदस्या दया मित्रगोत्री आणि चित्रा क्षीरसागर यांना ही काव्य मैफलच्या संस्थापिका कविता बोरकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महिला दिनानिमित्ताने साहित्यिक चित्रा क्षीरसागर यांचे प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी कोणत्याही क्षणी हार न मानता आपला प्रवास चालू ठेवावा असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले.

होळी सणाच्या निमित्ताने वैशाली व्हरकट यांनी खेळाचे आयोजन केले होते. त्यानंतर दुसऱ्या सत्रात सुरू झालेल्या काव्यमैफलीत एकापेक्षा एक सरस कवितांनी काव्यमैफल सजत गेली. प्रसाद सावंत, पंढरीनाथ लोटलीकर, अभय सुराणा, हनुमंत मावजो, राजेंद्र मेंगाने, डॉ. संजय गायकवाड, कविता बोरकर, शोभा धामस्कर, दया मित्रगोत्री, चित्रा क्षीरसागार , आमोद कुलकर्णी, उषा कामत, प्रकाश क्षीरसागर, मेघना कुरूंदवाडकर, स्मिता तिंबलो, रजनी रायकर, डॉ. श्यामा सिंगबाळ, पुष्पा गायतोंडे, माणिक आळवे यांच्या कवितांना टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बाल कवी प्रथन सावंत यांनी सादर केलेली कविता उद्बोधक होती. नवीन सदस्या मंजिरी वाटवे आणि वर्षा साठे शिंत्रे यांनी काव्य मैफलीत प्रथमच आपली कविता सादर केली. समर मुर्रेनवी, अमेय नाईक, शाबलो पर्रेकर, उमेश नाईक, वैशाली व्हरकट, रेशम झारापकर, बबीता नार्वेकर, मीना रेडकर, स्मिता वेर्णेकर, अजय जेवळीकर, कविता आमोणकर यांच्या कवितांना ही दांडगा प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरवात झाली. मान्यवरांची ओळख रेशम झारापकर, बबीता नार्वेकर, रजनी रायकर, कविता बोरकर यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता आमोणकर यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 201 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .